2015

(४)

जिल्हाधिकारी मुंबई
उपनगर जिल्हा कार्यालय
28
19647
517

क्रमांक : एलआरएफ-२६०५/२२२/प्र.क्र. २५८०/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३ ऑगस्ट, २००६.

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
पश्चिम खानदेश दलित शिक्षण संस्थेच्या ताब्यातील
सांताक्रुझ, टी.पी.एस. ६ भूखंड क्र. १८ व १९ उपभूखंड क्र. ३१.
३२ व ३३ मधील १७०२ चौ.मी. जमीन ज्ञानेश्वरी शिक्षण ट्रस्ट, चेंबूर,
मुंबई या संस्थेस हस्तांतरीत करण्यास परवानगी मिळण्याबाबत...

ज्ञापन :-

जिल्हाधिकारी. मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या वरील विषयाबाबतच्या क्र. २२/३ए/ए-८३१, दिनांक २/३/२००६ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, शासन ज्ञापन क्र.एलआरएफ-२६७९/७५६/प्र.क्र.१४०८/ग-६, दि.१५/१२/१९८३ अन्वये मौजे सांताक्रुझ, टी.पी.एस. ५, भूखंड क्र. १८ व १९, उपभूखंड क्र. ३१, ३२ व ३३ मधील १८९४.८० चौ.मी. जमीन पश्चिम खानदेश दलित शिक्षण मंडळ, सांताक्रुझ, मुंबई यांना मंजूर करण्यात आली आहे. संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या जमिनीपैकी १९२.८ चौ.मी. जमिनीवर अतिक्रमण असल्याने सदर जागा वगळून उर्वरित १७०२ चौ.मी. जमिनीचा दि. ३/७/१९९० रोजी संस्थेस ताबा देण्यात आला आहे. त्यानंतर क्र.जमीन-२६९१/२२१७/ प्र.क्र. २९९६/ज-३, दि. ९/१०/१९९७ च्या शासन ज्ञापनान्वये संस्थेस मंजूर केलेल्या जमिनीपैकी १५% जमिनीचा वाणिज्य प्रयोजनासाठी वापर करण्यास संस्थेस परवानगी देण्यात आली आहे. वर नमूद १९२.८ चौ.मी. अतिक्रमित जागेचे शासकीय नियमानुसार देय असणारे मूल्य संस्थेने यापूर्वीच भरले असल्याने सदर १९२.८ चौ.मी. जमीन तसेच संस्थेच्या ताब्यात असलेली व नव्याने मागणी केलेली १७० चौ.मी. जमीन व मुख्य विकास रस्ता यामधील ९३.१ चौ.मी. जमिनीमधून संस्थेस जोडरस्त्यासाठी आवश्यक तेवढे क्षेत्र देण्याच्या संस्थेच्या विनंतीस अनुलक्षून शासनाच्या दि.१४/७/२००४ च्या ज्ञापनान्वये संस्थेस पोच रस्त्यासाठी (जोडरस्त्यासाठी) जमीन मंजूर करण्यात आली आहे. मात्र, संस्थेस वरील आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली अतिरिक्त जमीन ही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेपैकी असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने निदर्शनास आणून दिले. शासनाच्या दि.१४/७/२००४ च्या ज्ञापनाची अंमलबजावणी केल्यास झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास अडथळा निर्माण होईल तसेच सदरची योजना ही मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने कार्यान्वित होत असल्यामुळे व त्यांच्या आदेशाचे पालन होणे क्रमप्राप्त असल्यामुळे मा. मंत्री (महसूल) यांच्या दि. ४/१०/२००५ च्या आदेशान्वये जमीन मंजुरीचे दि. १४/७/२००४ रोजीचे शासन ज्ञापन रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे संस्थेकडे सध्या फक्त १७०२ चौ.मी. शासकीय जमीन ताब्यात आहे.

२. संस्थेस माध्यमिक शाळा व वसतीगृह या प्रयोजनासाठी जमीन मंजूर केली होती. तथापि संस्थेने अद्याप माध्यमिक शाळा व वसतीगृह सुरु केलेले नाही. म्हणजेच संस्थेस ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर केली आहे ते प्रयोजन साध्य झालेले नाही. तसेच ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यात आली ते प्रयोजन साध्य करणे अपुऱ्या निधीमुळे शक्य होणार नसल्याने अशाच प्रकारे शैक्षणिक-प्रयोजनाचे समान उद्दिष्ट असणाऱ्या ज्ञानेश्वरी शिक्षण ट्रस्ट, २६/१२६, सुभाष नगर, चेंबूर, मुंबई यांना ही जमीन हस्तांतर करण्याचा प्रस्ताव संस्थेने त्यांच्या दि. १२/१/२००६ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

क्रमशः....

३. या सर्व बाबी विचारात घेऊन संस्थेला मंजूर केलेली जमीन संस्थेने सुचविलेल्या दुसऱ्या संस्थेस हस्तांतरित करावी काय ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासन निर्णय क्र. एलएनडी-४८५७/ १६१४६-ए-१, दि.२१/११/१९५७ मध्ये ज्या प्रकरणात सवलतीच्या कब्जेहक्काने अथवा भोगाधिकार मुल्यरहित पध्दतीने जमीन प्रदान करण्यात आली असेल अशा प्रकरणात जमिनीची विक्री/हस्तांतरण करावयाचे असल्यास त्याबाबतचे प्रस्ताव शासनाच्या आदेशासाठी सादर करण्यात यावेत अशी तरतूद आहे. हे विचारात घेता पश्चिम खानदेश दलित मंडळ या संस्थेने, शासनाने मंजूर केलेल्या सांताक्रुझ, टी.पी.एस. ६ भूखंड क्र. १८ व १९ उपभूखंड क्र. ३१, ३२ व ३३ मधील १७०२ चौ.मी. जमीनीसाठी, शासनाकडे जमा केलेल्या सवलतीच्या कब्जेहक्काच्या रकमेच्या १० पट रक्कम अनर्जित उत्पन्नाची रक्कम म्हणून पश्चिम खानदेश दलित शिक्षण मंडळ या संस्थेकडून वसूल करुन शासन परिपत्रक, म.व व.वि. क्र. एलआरएफ-१०८३/ ७१३४/प्र.क्र. ३४७८/ज-३, दि. ८/२/१९८३ मधील अटी/शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटींवर प्रश्नाधीन जमीन ज्ञानेश्वरी शिक्षण ट्रस्ट, चेंबूर, मुंबई या संस्थेस हस्तांतरित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

<u>अट</u> :- १) सेवाभावी/सामाजिक संस्थांना शैक्षणिक व इतर लोकोपयोगी प्रयोजनासाठी सवलतीच्या दराने मंजूर केलेल्या जमिनीची विक्री/हस्तांतर केल्यावर त्यासंबंधात किती अनर्जित उत्पन्न वसूल करावे या बाबीवर धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर बाबीवर होणारा अंतिम निर्णय संस्थेस मान्य व बंधनकारक असेल.

२) संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून इमारत बांधकामाचे नकाशे व आराखडे मंजूर करुन घेतल्याशिवाय बांधकाम करु नये. इमारतीचे बांधकाम दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावे.

३) जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी.

४. प्रस्तुत ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने, त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६१४/०६/व्यय-९, दि.१४/७/२००६ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

( वि. सि. चखारे )
अवर सचिव
महसूल व वन विभाग.

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व),मुंबई -४०००५१.

प्रत :- १) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त, व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
५) कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) ज-३ कार्यासन (निवड नस्ती) महसूल व वन विभाग.

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.26556799, 26557807 Fax : 26556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :-२२ /३ ई /अे-०८३१
दिनांक :- ६ /३/२००७

**वाचले :-** १) शासन, महसुल व वन विभाग ज्ञापन क्र. [illegible] एफ-२६०५/२२२/प्र.क्र. २५८०/ज-३ दि. २३/८/२००६.
२) इकडील कार्यालयाचे पत्र क्र. २२/३३/अे-०८३१ दि. १/९/०६.
३) सचिव पश्चिम खानदेश दलित शिक्षण प्रसारक मंडळ यांचे पत्र दि. २७.११.०६.
४) ज्ञानेश्वरी शिक्षक ट्रस्ट यांचे पत्र दि. १२/२/२००७.

**<u>आदेश</u> :-**

मौजे सांताक्रुझ, टी पी एस VI भुखंड क्र. १८ व १९ उप भुखंड क्र. ३१,३२, व ३३ क्षेत्र १७०२ चौ. मी. पश्चिम खानदेश दलित शिक्षण संस्थेस मंजुर करण्यात आली होती. सदरची जमिन ज्ञानेश्वरी शिक्षण ट्रस्ट मुंबई यांना हस्तातरण करणेस परवानगी मिळणेबाबत संस्थेने शासनाकडे केलेल्या विनंतीनुसार उपरोक्त शासन ज्ञापन दि. २३/८/२००६ अन्वये काही अटी व शर्तीवर शासनाने मान्यता दिली आहे.

शासन ज्ञापनाचे अनुषंगाने अनर्जित उत्पन्नाची रक्कम भरणा करणेस संस्थेस उपरोक्त दि. १/९/०६ चे पत्रान्वये कळविणेत आले होते व प्रत ज्ञानेश्वरी शिक्षण ट्रस्ट मुंबई यांना अग्रेषित करुन शासनाचे परिपत्रक दि. ८/२/८३ व ज्ञापन दि. २३/८/०६ मधील अटी आणि जमिन प्रदानाकामी बांधण्यात येणाऱ्या अटी व शर्ती मान्य आणि बंधनकारक राहतील अशा आशयाचे हमीपत्र सादर करणेस कळविणेत आले होते.

पश्चिम खानदेश दलित शिक्षण प्रसारक मंडळ यांनी अनर्जित रक्कम [illegible] या कार्यालयात पावती क्र. २६४७८९३ दि. २७.११.०६ रोजी भरणा केली आहे. ज्ञानेश्वरी शिक्षण ट्रस्ट मुंबई यांचेतर्फे अध्यक्ष श्री. दिनकर खानविलकर यांनी रु. १००/- च्या मुद्रांक शुल्क कागदावर अटी व शर्ती मान्य व बंधनकारक असलेबाबत हमीपत्र दि. १२/२/०७ रोजी सादर केले आहे. वरीलप्रमाणे शासन ज्ञापन दि. २३/८/०६ ची पुर्तता झालेली असलेमुळे जमिन ~~हस्तांतरीत~~ हस्तांतरीत करण्यास परवानगी देण्यात यावी असे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी मौजे सांताक्रुझ, टी.पी.एस VI भुखंड क्र. १८ व १९ उप भुखंड क्र. ३१,३२, व ३३ क्षेत्र १७०२ चौ. मी. जमिन ज्ञानेश्वरी शिक्षण ट्रस्ट मुंबई यांचे नांवे हस्तांतरीत करणेस परवानगी देणेत येत आहे.

२८८८०
अ.का./१

**जिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हाकरिता**

अध्यक्ष
प्रत : पश्चिम खानदेश दलित शिक्षण प्रसारक मंडळ, प्रोफेसर कॉलनी देवपुर धुळे ४२४००२
WS-0831-mrs

प्रत :- पश्चिम खानदेश दलित शिक्षण प्रसारक मंडळ, प्रोफेसर कॉलनी नेहरु धुळे ४२४००२

प्रत :- [illegible] शिक्षण ट्रस्ट २६/२१६ सुभाषनगर चेंबूर मुंबई तहसिलदार अंधेरी / नगर भुमापन अधिकारी विलेपार्ले यांना माहितीसाठी

प्रत :- मा. प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सादर.

**जिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा.**